# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक २४.०५.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**हुडकेश्वर पोलीसांची कामगिरी :— क्रिकेट मॅचवर जुगार खेळणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २१.०५.२०२६ चे २१.४० वा. चे सुमारास, हुडकेश्वर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत, प्लॉट नं. ३८, धनंजय हाऊसिंग सोसायटी, दुबेचे घराचे दुसरे माळयावर, गारगोटी, नागपुर येथे राहणारा ईसम हा टि—२० आयपीएल—२०२६ पंजाब किंग्स् विरूध्द लखनऊ सुपर जॉयन्टस् या क्रिकेट सामन्यावर लागवडी—खायवाडी करीत आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी पंचासमक्ष जावुन, सापळा रचुन, रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी नामे १) संजय रतिराम बारई वय ४८ वर्षे रा. प्लॉट क्र. २१७, न्यु अमरनगर, हुडकेश्वर, २) हेमंत मनोहर बारई वय ३९ वर्षे रा. प्लॉट क्र. २६२, वकीलपेठ, रेशीमबाग चौक, नागपूर हे ०८ मोबाईल फोनद्वारे ग्राहकांकडुन क्रिकेट सामन्यावर सट्टयाची खायवडी करतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन ०८ मोबाईल फोन, नोटबूक व एक होंडा ॲक्टीवा क्र. एमएच ४९ बीसी ०१८०, एक एव्हीऐटर गाडी क्र. एमएच ३१ डीक्यु २८३० असा एकुण किंमती १,४८,८१०/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, ते त्यांचा साथीदार पाहिजे आरोपी नामे जगदीश खापेकर रा. टेलिफोन एक्सचेंज चौक, याचे मदतीने क्रिकेट सामन्यावर लागवडी—खायवाडी करीत जुगार खेळत असल्याचे सांगितले. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे कलम ३१८(४) भा.न्या.सं. सहकलम ४,५ म.जु.का. अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजीराव राठोड अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्रीमती अनामिका मिर्झापुरे, सपोनि रामटेके, पोहवा मुकेश कन्नाके, गणेश बोंद्रे, राजेश मोटे व पोअं. राजेश धोपटे यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे यशोधरानगर:— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २३.०५.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे भाऊ नामे अजय डब्बुलाल गज्जाम वय ३२ वर्ष रा. नाका नं. २, जगदंबा नगर, कामठी रोड, कपीलनगर, नागपूर हे त्यांचे शेजारी राहणारा मुलगा नामे मानव दामोदर नरुले वय १६ वर्ष याचेसह त्यांचे पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ४९ सीक्यु ७३४० ने पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत आकाशवाणी जवळील नारायणा विद्यालयम स्कुल समोर, चस्का टि स्टॉल जवळून जात असता, एका सिमेंट मिक्सर वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन पॅशन प्रो मोटार सायकलला कट मारल्याने मोटार सायकलवरील

चालकाचा ताबा सुटून मोटार सायकल रोडचे मध्यभागी असलेल्या सिमेंट गर्डरला धकडली व त्यावरील दोघेही गंभीर जखमी झाले. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी फिर्यादीचा भाऊ अजय यास मृत घोषीत केले. मानव याचेवर उपचार सुरु आहेत.

यापकरणी फिर्यादी विजय डब्बुलाल गज्जाम वय ३२ वर्षे रा. नाका नं. २, जगदंबा नगर, कामठी रोड, कपीलनगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे सपोनि संतोष मुंडे यांनी सिमेंट मिक्सर वाहन चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१),१२५(ब) भा.न्या.सं. सहकलम १३४,१८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे जुनी कामठी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २४.०५.२०२६ चे ११.३० वा. ते १२.३० वा. चे दरम्यान, जुनी कामठी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, नालापार मस्जिद, नया बाजारकडे जाणारा रोड, फैयाज अहमदचे घराजवळ एका टिनाचे शेडमध्ये गोवंशीय जनावरे यांना बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष रेड कारवाई केली असता त्या ठिकाणी एकुण १३ लहान मोठी गोवंशीय जनावरे यांना अत्यंत क्रुरपणे व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेले मिळुन आले. नमुद जनावरांचे मालकाबाबत माहिती काढली असता जनावरे हे आरोपी अहफाज हुसेन वल्द मोहम्मद अनवर हुसेन वय २६ वर्ष रा. कोळसा टाल, नवाब बंडीवाल्याचे घराजवळ, कामठी, नागपूर यांची असल्याचे समजले. घटनास्थळावरून एकुण १३ गोवंशीय जनावरे किंमती अंदाजे १,९५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद गोवंशीय जनावरे यांना गोशाळा येथे दाखल करण्यात आले आहे.

यापकरणी फिर्यादी पोअं. शारीक खान, पोलीस ठाणे जुनी कामठी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जुनी कामठी येथे पोउपनि आकाश महल्ले ९०६७६३९४३५ यांनी आरोपीविरूध्द कलम ५(ब),९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१)(ड) प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम—१९६०, अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे भांडेवाडी</u> :—** दिनांक २४.०५.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत छत्तरपूर फार्म रोड, दुर्गा माता मंदीरजवळ, भांडेवाडी येथे एक अनोळखी महिला वय अंदाजे ६० ते ६५ वर्षे वयाच्या, बेशुध्द अवस्थेत मिळून आल्या. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. नमुद महिला हया मागील ४ ते ५ दिवसापासून परिसरात फिरत असून त्या कन्नड भाषेत बोलत होत्या व भिक्षा मागून उदरनिर्वाह करुन तेथेच राहत होत्या. असे फिर्यादीनी सांगितले.

यापकरणी फिर्यादी पवन निर्मलराव चिकटे वय ३२ वर्ष रा. प्लॉट क्र. १, तरोडी बु., भांडेवाडी, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे पोउपनि. ज्ञानचंद दुबे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**